International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No.6 July-Aug 2024

# बुध्दीप्रामाण्यवादी गोपाळ गणेश आगरकर यांचे जीवनकार्य

**ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
संशोधक विद्यार्थिनी, (BSc, MA. , NET)
**Corresponding Author- ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
**Email:** aishwaryaballal18@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14196417**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्रातील विचारवंत, धार्मिक, सामाजिक सुधारणांचे अग्रणी, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ व प्रबोधनकार गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी सातारा जिल्हयातील टेंभू या गावी आला. अनेक समाजसुधारक व विचारवंतांच्या अथक प्रयत्नांमुळे मराठी समाज पुढे प्रबोधनाच्या वाटेवर आला. त्यापैकी महत्वाचे नाव येते ते गोपाळ गणेश आगरकरांचे. उदारमतवादी व बुध्दी प्रामाण्यवादी विचार असणारे ते मोजक्यातच एक होते. समाजसुधारणा फक्त कृतीतच उतरल्या नाहीतर त्यांच्या ध्यानी मनी फक्त तेच असायचे. स्वतः ब्राम्हण असून त्यांनी ब्राम्हण वृत्तीला प्रखरपणे विरोध केला. प्रसंगी त्यांना जनतेच्या रोषाला जावे लागले. त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या येत होत्या, पण ते मागे हटले नाहीत. आपले स्वतंत्र विचार त्यांनी निर्भिडपणे मांडले. एकदा त्यांना स्वतःची जीवंतपणीच प्रेतयात्रा पाहावी लागली होती.

आगरकरांचे प्राथमिक शिक्षण कऱ्हाडला मामाच्या गावीच झाले. घरची परिस्थिती हलाखीची होती त्यामुळे त्यांनी मिळेल ती नोकरी करुन शिक्षण सुरु केले. कधी न्यायालयात कारकून, कधी कंपाउंडर, कधी मामलेदार कचेरीत उमेदवारी करुन शिक्षण पूर्ण केले. रत्नागिरीला पुढील शिक्षणासाठी गेले. परंतु गरिबीमुळे शिक्षणात अडथळे परत कऱ्हाडला आले. १८७५ मध्ये अकोल्यात मॅट्रीक पास झाले. पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्याला आले. पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तिथेच लोकमान्य टिळकांबरोबर ओळख झाली व मैत्री झाली. १८७८ मध्ये त्यांना सोबतच पदवी मिळाली. निबंध स्पर्धा, वकर्तृत्व स्पर्धा, वर्तमानपात्रात लेखन करणे यातून ते उपजीविका भागवतः १८८१ मध्ये एम.ए. पास झाले. तत्वज्ञान व इतिहास या विषयावर 'वऱ्हाड' समाचार मध्ये लेख लिहून शिष्यवृत्ती मिळवत. उयून पुढे त्यांची समाजसुधारणेला वाटचाल सुरु झाली. लोकमान्य टिळकांना सोबत घेऊन त्यांनी वृत्तपत्र काढून आपले विचार मांडण्यास सुरुवात केली.

**उदिष्ट्ये :**

१. गो.ग. आगरकर यांचे पुरोगामी विचार विस्तारीत करणे:
२. गो.ग. आगरकर यांनी केलेल्या समाजसुधारणांचा आढावा घेणे.
३. गो.ग. आगरकर यांची धमर्माबाबतची मते समजून घेणे.
४. गो.ग. आगरकर यांची पत्रकारिता व विविध लेख यांची माहिती घेणे

**गो.ग.आगरकरांचे शैक्षणिक कार्य:**

समाजात जर सुधारणा आणायची असेल, तर शिक्षण महत्वाचे हे गोपाळराव जाणून होते. पण त्या काळी फक्त ब्रिटीश शाळा होत्या आणि त्या शाळांमध्ये त्यांचा इतिहास, तत्वे, मुल्ये शिकवली जात होती. हे आगरकर व टिळकांना खटकले व त्यांनी स्वतःची एक शाळा सुरु करायची असे ठरवले. फक्त आपल्या उपजिविकेपुरते पैसे घेऊन बाकीचे पैसे समाजकार्याला वाहायचे या तत्वावर आगरकर, टिळक व विष्णुशास्त्री चिपुळणकर यांनी शाळा सुरु केली. १८८० मध्ये – 'न्यु इंग्लिश स्कुल'ची स्थापना झाली. शिक्षणा विषयी त्यांची स्वतंत्र मते होती, ती पुढीलप्रमाणे: प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे आणि जे पालक मुलामुलींना प्राथमिक शाळेत पाठवणार नाहीत त्यांना दंड करावा, मुला-मुलींना समानतेची वागणूक द्यावी, प्राथमिक शिक्षण सरकारची जबाबदारी असावी, विद्यापीठीय शिक्षण देशी भाषेत असावे अशी ही आधुनिक विचारसरणीची मते होती. कला शाखेचा तीन वर्षांचा अभ्यासक्रम कष्टावह आहे म्हणून त्यांनी तक्रार केली होती. १८८४ मध्ये पुणे येथे 'डेक्कन एज्युकेशन सोसायटीची' स्थापना आगरकर व टिळकांनी मिळून केली होती. १८८५ मध्ये या अंतर्गतच फर्ग्यूसन कॉलेजची स्थापना झाली. पुढे या कॉलेजचे दुसरे प्राचार्य म्हणून आगरकरांची नेमणूक झाली.

**आगरकरांच्या चतुःसूत्री व मुलतत्वे :**

**चतुःसूत्री**

१. बुध्दीवादी
२. व्यक्तिवाद
३. समता
४. मानवतावाद

**मुलतत्वे :**

१. बुध्दीप्रामाण्य

२. व्यक्तीस्वातंत्र्य

३. मानवाचे ऐहिक सुखसंवर्धन

**बुध्दीप्रामाण्यवाद :**

आगरकरांची खरी ओळख बुद्धीप्रामाण्यवादी म्हणूनच आहे. त्या काळी असा विचार बाळगणारे तुरळक होते. बुध्दीप्रामाण्यवाद म्हणजे बुद्धीला पटेल तेच करणे आणि न पटेल ते सोडून देणे. कोणतीही गोष्ट डोळसपणे स्वीकारली पाहिजे, अंधश्रध्देने ती करु नये, मनास जे योग्य तेच लिहावे, बोलावे, सांगावे व करावे असे त्यांचे मत होते. यावर ते म्हणायचे, "इष्ट असेल तेच बोलणार आणि साध्य असेल ते करणार."

**व्यक्तीस्वातंत्र्य :**

आगरकर जात-भेद न मानता प्रत्येकाच्या व्यक्तीस्वातंत्र्याचा आदर करणारे होते. व्यक्तीस्वातंत्र्य म्हणजे पुढच्या व्यक्तीचा आदर करून परस्परांशी समान व उदारपणे वर्तन ठेवणे होय. यावर त्यांची पुढील मते होती, जन्मसिद्ध चातुर्वण्यपध्दती ही व्यक्तिस्वातंत्र्य तत्वाच्या विरोधी आहेत, सर्व बंधने सोडून व्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावा, त्याचा वापर समाजहित व देशहितासाठी करावा, व्यक्तीसाठी समाज असतो, समाजासाठी व्यक्ती नसते असा त्यांचा विचार होता.

**गोपाळराव आगरकरांचे स्त्रीविषयक विचार :**

स्त्री व पुरुष हे समानच आहेत. त्यांना समानतेची वागणूक दिली पाहिजे या मताचे आगरकर होते. स्त्री शिक्षणावर त्यांनी भर दिला व मुलींच्या शिक्षणाची सक्ती केली. त्यांनी याविषयी 'स्त्रियांना वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावे की नाही?' हा लेख लिहिला होता. यात त्यांनी स्त्री शिक्षण, समानता, स्त्रियांना चरितार्थ चालविण्याचे काम दयावे, विधवांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करावे असे विचार मांडले होते. आताच्या पुरुषप्रधान संस्कृतीला न पचणारे विचार त्यांनी त्याकाळात उद्गारले होते. त्यांना स्वतःच्या 'सुधारक' या पत्रात सुशिक्षित स्त्रीयांचे लेख प्रकाशित केले होते. बालविवाह, विधवापुनर्विवाह, विधवांची वाईट स्थिती, केशवपन, सती इ. विरोधी त्यांनी बुध्दीवादी विचार मांडले होते. विभक्त कुटुंबपध्दतीचा त्यांनी पुरस्कार केला. स्त्री सुधारणे शिवाय प्रगती नाही असे त्यांचे मत होते.

**विधवांच्या वाईट स्थितीला विरोध:**

फर्ग्यूसन कॉलेजचे प्राचार्य वामन आपटे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीचे केशवपन केले हे पाहून आगरकर दुःखी झाले. त्यावेळी त्यांची पत्नी यशोदाबाई यांच्याकडून शपथ घेतली. की तिने केशवपन करु नये. यावर त्यांनी 'शहाण्यांचा मुर्खपणा' हा लेख लिहिला व सक्तीच्या वैधव्यावर टिका केली. विधवा ही हिंदू लोकांच्या मत्सराची, अविचाराचे विपरीत व रानटी धर्मश्रध्देची खुण असल्याचा विचार मांडला.

**बालविवाहास विरोध :**

बालविवाहामुळे स्त्रीयांची दुःस्थिती निर्माण होते. संतती व समाजावर याचा परिणाम होतो. स्त्रीयांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे, असे त्यांनी विचार मांडले व प्रौढ विवाहाचा पुरस्कार केला. यासाठी त्यांनी संमतीवयाच्या बिलाला पाठिंबा दिला. यात मुलाचे विवाहाचे वय १६ ते १७ वर्षे व मुलीचे विवाहाचे वय १० ते १२ वर्षे असे होतेः १४ वर्षाखालील मुलीचा विवाह करणार नाही अशी शपथ पालकांनी घ्यावी असे सांगितले. बालविवाह होत असेल तर न्यायालयाने ते विवाह रद्द करावे अशा सूचना आगरकरांनी दिल्या.

**जरठविवाहास विरोध :**

जरठविवाह म्हणजे पुरुष ५० वर्ष वयाचा आणि मुलगी १०-१२ वर्षाची यांचा विवाह होय. यामुळे स्त्रियांना कमी वयात वैधव्य येते. बालसंगोपण व संसाराची जबाबदारी त्यांच्यावर कमी वयातच पडते, त्यामुळे त्यांचा लवकर मृत्यू होतो. म्हणून त्यांनी जरठविवाहावर टीका केली. यावर त्यांनी 'समज नाही हेच?' हा लेख लिहिला व जरठ- विवाहावर कायदा करण्याची गरज सांगितली.

**संततीनियमन :**

स्त्रियांच्या इच्छेनुसार व परिस्थितीला अनुसरुन संतती व्हावी असे त्यांचे मत होते. स्त्रीस्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला. स्त्री-पुरुषातील संबंध स्वामी आणि सेवक असे न ठेवता समानतेच्या व संमतीच्या पायावर उभारणी झाली पाहिजे असे त्यांचे मत होते.

**स्त्रा पोषाख:**

**लेख : आमच्या स्त्रियांचे पेहराव?**

यात त्यांनी स्त्रियांना साडी, चोळी, चोळीवर जॅकेट, पायात बूट, थंडीत हातमोजे, पायमोजे, उन्हाळयात पावसाळयात छत्री असा आधुनिक पोषाख असावा असे मत नोंदवले.

**आगरकरांच्या समाजसुधारणा व सामाजिक विचार :**

इंदौरच्या संस्थानिकाकडून त्यांना मासिक ५०० रु. पगाराची नोकरीची संधी दिली असताना त्यांनी मात्र ती नाकारली. नोकरीपेक्षा त्यांना समाजसेवा महत्वाची वाटली म्हणून त्यांनी आईला पत्र लिहिले; 'नोकरीमुळे दारिद्र्य संपेल' असे तुला वाटत असेल तर मी सरकारी नोकरी करणार नाही, मी अधिक संपत्तीची हाव धरणार नाही, मी सर्व वेळ जनहितासाठी घालवेल. समाजसुधारणेसाठी त्यांनी सुधारक, केसरी व मराठा इ. वृत्तपत्रांचा आधार घेतला. यातून त्यांनी समाज उध्दबोधनाचे कार्य सुरु केलेः एकदा एका विचारावर त्यांना कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणात १०१ दिवस कारावास भोगावा लागला होता. लोकांच्या संमतीनेच समाजात परिवर्तन घडवून आणले पाहिजेत असे त्यांचे मत होते.

**जातीभेद:**

जाती, उपजाती, जमाती, उच्चनीचतेचा भेदभाव यामुळे देशाचे नुकसान झाले असे प्रतिपादन त्यांनी काढले.

जातिभेद हे ईश्वरनिर्मित नाहीत. ते नष्ट केले पाहिजे असा त्यांचा विचार होता.

**अस्पृश्यता :**

अस्पृश्यतेच्या रुढी व अविचारीपणा त्यांनी दाखवून दिला. आगरकरांनी यावर 'म्युन्सिपल हौद व ब्राम्हणांवर गहा' हा लेख लिहिला. अस्पृश्यता व सोवळ्या ओवळ्यांवर टीका केली. इंग्रजांच्या गुणांचे अनुकरण करा असे मत मांडले.

**आगरकरांचे धार्मिक विचार :**

शब्दापेक्षा ज्ञान आणि ज्ञानापेक्षा विज्ञान श्रेष्ठ अशी आगरकरांची भावना होती. त्यामुळे त्यांची ओळख देव न मानणारे देवमाणुस अशी होती. धार्मिक विचारावर टिका करण्यामुळे सनातनी मंडळींनी त्यांची जीवंत प्रेतयात्रा काढली होती.

**मुर्तिपुजा :**

मुर्तिपुजा त्यांना मान्य नव्हती. यावर त्यांनी 'मुर्तीपुजेचा उद्रेक प्रकार' हा लेख लिहिला होता. ईश्वराचे अस्तित्व ते मान्य करत नव्हते. सण, उत्सव आगरकरांनी बीभत्स सणांवर टीका केली. शिमगा सण हिंदू धर्माच्या नावाखाली लज्जास्पद आचरण आहे असे मत होते. यावर त्यांनी 'पाच- जनांचा हंगाम' हा लेख लिहिला.

**पशुहत्यावर बंदी:**

यावर त्यांनी 'धर्माचा सुकाळ व बकऱ्यांचा काळ' हा लेख लिहिला. 'ज्यांना यंज्ञ करुन जन्ममरणापासून मुक्त व्हायचे आहे त्यांनी स्वतःच्या शरीराच्या काही भागाची आहुती देण्यास काय हरकत आहे?' असे त्यांनी विचारले.

**आगरकरांचे लेख :**

१. हिंदुस्थानचे राज्य कोणासाठी?
२. मराठमोळा व मराठमोळ्यांची पुरवणी
३. वळयाची मीमांसा व सोवळया ओवळयाची पुखणी
४. प्रेतक्रिया व प्रेतसंस्कार
५. धर्मकल्पना आली कोठून,
६. आत्मा अमर नाही.

**आगरकरांची ग्रंथसंपदा :**

१. डोंगरीच्या तुरुंगातील १०१ दिवस
२. विकार विलासीत
३. गुलामगिरीचे शस्त्र
४. वाक्यमिमांसा
५. अलंकार मीमांसा
६. फुटके नशीब
७. जात्यूच्छेदक निबंध
८. वाक्यांचे पृथ्थकरण
९. स्वराज्याच्या दिशेने वाटचाल.

**मूल्यमापन :**

अवघ्या ३९ वर्षाच्या आयुष्यात गोपाळ गणेश आगरकरांनी संपुर्ण महाराष्ट्र ढवळून टाकला आणि येणाऱ्या कित्येक पिढ्यांना देखील त्यांनी त्यांच्या तळपत्या लेखणीने विचार करायला भाग पाडलं. 'लोकांच्या सुखासाठी मी कोणताही त्याग करण्यास तयार आहे' असे वाक्य त्यांच्या 'डोंगरीच्या तुरुंगातील १०१ दिवस' या पुस्तकात आहेत. समाजाच्या भल्यासाठी वाटेल ते सोसण्याची तयारी असणारे आगरकर समाजाच्या वाईट चालीरीतीबाबत अत्यंत कठोर शब्दांत आपले विचार प्रकट करत. यामुळे त्यांना जनतेचा रोष पत्करावा लागला. तरीही त्यांनी आपले विचार निर्भिडपणे मांडले. त्यांचे स्त्रियांच्या उन्नतीबाबत विशेष लेख होते. जर समाज सुधारायचा असेल तर आधी स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे या विचाराचे ते होते. स्त्रियांच्या अनिष्ट प्रथेबाबत त्यांना हळहळ वाटायची. विविध ग्रंथातून त्यांनी स्त्रियांना जागे करण्याचे कार्य केले. आजच्या २१ व्या शतकातही स्त्रियांची परिस्थिती हलाखीची आहे. स्त्रियांच्या विचारांचा पुरस्कार करणाऱ्या अशा अनेक आगरकरांची उणीव भासतेय. आगरकरांचे हे विचार लोकांपर्यंत पोहचावेत व समाजात जागृती व्हावी म्हणून हा शोधनिबंध. अशा या बुध्दीप्रामाण्यवादी समाजसुधारकाचा अवघ्या ३९ व्या वर्षी देहांत झाला व महाराष्ट्रीय समाज एका आदर्शवादी व निर्भिड पत्रकाराला मुकला. सनातनी लोकांनी त्यांची जीवंत प्रेतयात्रा काढला होती, मात्र १८९५ मध्ये त्यांची अंतयात्रा निघाली.

**संदर्भ ग्रंथ :**

1. खांडेकर वि.स., गोपाळ गणेश आगरकर व्यक्ती आणि विचार, मेहता पब्लिशिंग हाऊस.
2. गणाचारी अरविंद, गोपाळ गणेश आगरकर बुध्दिप्रामाण्यवादी विचाखंत आणि थोर समाजसुधारक, पॉप्युलर प्रकाशन, पुणे.
3. अळतेकर माधव दामोदर, गोपाळ गणेश आगरकर चरित्र, वरदा प्रकाशन प्रा.लि., पुणे.
4. कठारे अनिल, महाराष्ट्राचा समग्र इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड.
5. डॉ.गाठाळ एस. एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.